**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 11th September 2018**

**Article regarding Ganeshotsav celebration in R. A. Podar College**

## पोदारमध्ये यंदा भारतीय संस्कृतीचा संदेश

यंदा कॉलेजच्या गणपतीचे ७८ वे वर्ष आहे. पोदार एक शैक्षणिक संस्था असल्याने आम्ही गणेशोत्सवातून एक सामाजिक संदेश देत असतो. तो संदेश आम्ही सांस्कृतिक कार्यक्रम जे भरवतो त्यातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचेल अशा प्रकारे हे कार्यक्रम आखतो. तसेच हे सांस्कृतिक कार्यक्रम आमच्या थीमनुसार ठरलेले असतात. गेल्यावर्षी आमची थीम स्वराज्य ते सुराज्य ही होती तर यंदा आम्ही भारतीय कलासंस्कृती ही थीम करणार आहोत. भारतीय संस्कृती ही परदेशात प्रचलित आहे तर आपल्याकडे पाश्चात्य संस्कृतीने वेढा घातलेला आहे. असे असताना आपण आपली कलासंस्कृती जागृत ठेवण्यासाठी काय करत आहोत यावर यंदाचा गणेशोत्सव आधारलेला असेल. यालाच सरून डेकोरेशन म्हणून बदामी आणि एलोरामध्ये जे नटराजाचे पहिले शिल्प साकारण्यात आले तो देखावा आम्ही तयार करण्यात आहोत. त्याचसोबत दीड दिवसाच्या गणपतीमध्ये महाआरती, महाप्रसाद असतोच असतो. शिवाय गणपतीच्या मूर्तीपासून ते डेकोरेशनपर्यंत सगळ्या गोष्टी या पर्यावरण स्नेही आणि वर्तमानपत्रांपासून बनविलेले अस्तात. तसेच डेकोरेशनसाठी वापरलेले कागद हे कॉलेजच्या नॅचरल क्लबशी संपर्क साधून त्यापासून अजूनं पेपर बनविले जातात, तर गणपतीच्या मूर्तीचे विसर्जन हे कॉलेजमध्येच होते व तीन दिवसांनी मूर्ती पाण्यात विसर्जित झाल्यानंतर ते पाणी झाडांना घातले जाते. - **तेजस पेडणेकर**

